पुढारी

# शिक्षण मंडळ भविष्याचा वेध घेणारी संस्था : अ‍ॅड. कदम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

संस्थेने काळाची पावले ओळखून डिजिटल स्कूल, ई साहित्य, परदेशी भाषा बोलण्यासाठी परदेशी शिक्षकांशी संवाद व सर्व आधुनिक साहित्य शाळांना उपलब्ध करून दिल्याने संस्था सर्वच बाबतीत अग्रगण्य ठरली. त्यामुळे ही संस्था भविष्याचा वेध घेऊन मार्गक्रमण करणारी संस्था ठरल्याचे मत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव अ‍ॅड. संदीप कदम यांनी मांडले.

महाराष्ट्र राज्य क्रीडा शिक्षक महासंघाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय शिक्षणाच्या आधुनिक वाटा या वेबीनारमध्ये ते बोलत होते. या वेबीनारमध्ये अहमदनगर येथील आत्मा मलिक शैक्षणिक संकुल, कोकमठाण या संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी आणि धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथील हस्ती शैक्षणिक संकुल संस्थेचे अध्यक्ष कैलासजी जैन यांनीही सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसोबत पालकांचे समुपदेशन करत संस्थेच्या शाळेत इंग्लीश कम्युनिकेशन स्कील,



स्पर्धा परीक्षा, ब्रिलियांटा स्कॉलरशिप बॅच व आधुनिकतेची कास धरत डिजीटल साहित्याचा, ई-कंटेंटचा उपयोग केल्याने शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील गुणवत्ता वाढल्याने संस्थेतून अनेक विद्यार्थी उच्च पदस्थ ठिकाणी पोहचले. आज शासनाकडून जी शैक्षणिक भूमिका राबवली जात आहे त्या आधुनिक योजनेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे काळजी गरज आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाला शंकरराव उरसळ ते अजित पवार असे दूरदृष्टी नेतृत्व लाभले. केजी टू पीजी अशा सर्व क्षेत्रात पुणे विभागात सर्वाधिक कोर्सेस संस्थेमार्फत चालविले जात असून, गुणवत्तेत अग्रस्थानी आहे. क्रीडा क्षेत्रात प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचे खेळाडू पोहोचत असल्याचे कदम यांनी सांगितले.

Pune Edition
26 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

वाघोली
बुलेटीन

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळ हे भविष्याचा वेध घेणारी संस्था - ॲड. संदिप कदम

**पुणे : प्रतिनिधी**

नरसापूर येथे १९५६ साली ३४ विद्यार्थ्यांना घेऊन सुरू केलेल्या संस्थेत एक लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळत आहे. संस्थेने बहुजन समाजातील व ग्रामीण भागातील होतकरू, गरीब विद्यार्थी डोळयासमोर ठेऊन गुणवत्ता वाढीसाठी अविष्कार गुणवर्धन उपक्रम सुरू करून गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची वर्गवारी करत "शिक्षक-विद्यार्थी दत्तक" सारखी गुणवत्तेसाठीची विशेष योजना शिक्षकांच्या माध्यमातून राबवून गुणवत्तेत कमी असणा-या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी गुणवत्ता वाढीसाठी दत्तक घेतले.

विद्यार्थ्यांसोबत पालकांचे समुपदेशन करत संस्थेच्या शाळेत 'इंग्लीश कम्यूनिकेशन स्कील', स्पर्धा परीक्षा, 'ब्रिलियांटा स्कॉलरशिप बॅच' व आधुनिकतेची कास धरत डिजीटल साहित्याचा ई कंन्टेंटचा उपयोग केल्याने शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील गुणवत्ता वाढल्याने संस्थेतून अनेक विद्यार्थी



अॅड. संदिप कदम

उच्चपदस्थ ठिकाणी पोहचले. आज शासनाकडून जी शैक्षणिक भूमिका राबवली जात आहे, त्या आधुनिक योजनेत सहभागी होऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे काळजी गरज आहे. संस्थेने काळाची पावले ओळखून डिजीटल स्कूल, ई साहित्य, परदेशी भाषा बोलण्यासाठी परदेशी शिक्षकांशी संवाद व सर्व प्रकाराचे आधुनिक साहित्य शाळांना उपलब्ध करून दिल्याने संस्था सर्वच बाबतीत अग्रगण्य ठरली.

त्यामुळे ही संस्था भविष्याचा वेध घेऊन मार्गक्रमण करणारी संस्था ठरल्याचे मत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव ॲड. संदिप कदम यांनी मांडले. महाराष्ट्र राज्य क्रीडा शिक्षक महासंघाने आयोजित केलेल्या राज्य स्तरीय "शिक्षणाच्या आधुनिक वाटा" या वेबीनारमध्ये ते बोलत होते.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने संस्थापक अध्यक्ष शंकरराव उरसळ यांचे पासून मामासाहेब मोहोळ, अण्णासाहेब औटे, रामकृष्ण मोरे, मामासाहेब पिंपळे तसेच इतर पदाधिका-यांच्या अथक प्रयत्नांने व अजितदादांच्या दूरदृष्टी नेतृत्वाने संस्थेला महाराष्ट्रात वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.

केजी टू पीजी अशा सर्व क्षेत्रात पुणे विभागात सर्वाधिक कोर्सेस संस्थेमार्फत चालविले जात असून गुणवत्तेत अग्रस्थानी आहे. क्रीडा क्षेत्रात प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचे खेळाडू पोहचत आहेत. यामध्ये संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे मोलाचे कार्य असल्याने व शिक्षणाच्या आधुनिक वाटा हाताळल्याने संस्था महाराष्ट्रात अग्रगण्य ठरली आहे असे कदम म्हणाले.

या सदरात शिक्षणाच्या आधुनिक वाटा सेमिनारमध्ये आत्मा मलिक शैक्षणिक संकुल, कोकमठाण. अहमदनगर अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी व हस्ती शैक्षणिक संकुल दोंडाईचा (जि. धुळे) संस्थेचे अध्यक्ष कैलासजी जैन यांनी संस्थेने राबविलेल्या शिक्षणाच्या आधुनिक वाटांची माहिती दिली.

या वेबिनारकरिता संस्था सचिव ॲड. संदीप कदम यांनी मार्गदर्शन केले. राज्य भरातून बहुसंख्य शिक्षक, शिक्षणप्रेमी यांनी सहभाग घेत फेसबुक लाईव्ह व झूम ॲपद्वारे विविध योजनांची व सॉफ्टवेअरची माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर यांनी केले. तर सहसचिव विलास घोगरे यांनी कार्यक्रमाचे संचलन केले. प्रा. अनिल दाहोत्रे यांनी प्रमुख पाहुण्यांच्या कार्याचा परीचय करून दिला. आनंद पवार व धुळे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे तांत्रिक संयोजन गणेश म्हस्के, बाळासाहेब कोतकर यांनी केले. यावेळी मामासाहेब मोहोळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण झावरे आदि मान्यवर उपस्थित होते.